# 'अविष्कार २००३' छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शन

ठाणे दि. १८ - फोटो सर्कल सोसायटी, ठाणे व ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'अविष्कार २००३' ही छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शन ठाण्याच्या गडकरी रंगायतन येथे आयोजित केले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सुप्रसिद्ध वृत्तपत्र छायाचित्रकार मोहन बने यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन करून झाले.

महापौर सौ. शारदा राऊत, खासदार सतीश प्रधान, भाजपाचे ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष प्रभाकर सावंत, उपमहापौर ॲड. सुभाष काळे, स्थायी समिती सभापती गोपाळ लांडगे, सभागृह नेते एकनाथ शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती विजय पडवळ, प्रतोद अनिल सावे, शिवसेना महिला आघाडी प्रमुख सौ. विमल मोरे, ज्येष्ठ नगरसेवक विलास सामंत, मिलींद पाटणकर, सौ. माधवी नाईक, फोटो सर्कल सोसायटीचे विविध पदाधिकारी, ज्येष्ठ छायाचित्रकार व ठाणेकर नागरिक उपस्थित होते. खासदार सतीश प्रधान, भाजपाचे अध्यक्ष प्रभाकर सावंत यांची यावेळी समयोचित भाषणे झाली.



*महापौर चषक छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना सुप्रसिद्ध वृत्तपत्र छायाचित्रकार मोहन बने, सोबत खासदार सतीश प्रधान, महापौर सौ. शारदा राऊत, उपमहापौर सुभाष काळे, भाजपाचे ठाणे शहर (जि.) अध्यक्ष प्रभाकर सावंत, शिवसेना महिला आघाडीप्रमुख सौ. विमल मोरे, सभागृह नेते एकनाथ शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक समिती सभापती विजय पडवळ, प्रतोद अनिल सावे, फोटो सर्कल सोसायटीचे अध्यक्ष नयन तांबोटकर आणि इतर. (छाया : संतोष कोळसुलकर)*

या प्रसंगी ज्येष्ठ छायाचित्रकार मधुकर उर्फ काका हरदास यांनी छायाचित्रणासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना महापौर सौ. शारदा राऊत यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फोटो सर्कल सोसायटीचे अध्यक्ष नयन तांबोटकर यांनी केले.

फोटो सर्कल सोसायटी गेली ५ वर्षे ठाण्यातील व्यावसायिक व हौशी छायाचित्रकारांचे व्यासपीठ म्हणून काम करीत आहे. दरवर्षी एक नवीन सामाजिक विषय घेऊन हे प्रदर्शन भरविले जाते. यावर्षी 'सिव्हीक अवेअरनेस' (जनजागृती) हा विषय घेण्यात आला आहे. या प्रदर्शनात ७०० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले आहेत. हे प्रदर्शन २० ऑक्टोबरपर्यंत रसिकांना पाहता येईल.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आला असून बक्षिस समारंभ रविवार १९ ऑक्टोबर रोजी सायं. ७ वा. सुप्रसिद्ध छायाचित्रकार अविनाश बेंद्रे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून महापौर सौ. शारदा राऊत उपस्थित राहणार आहेत.

व्यावसायिक गट - पिक्टोरियल - प्रथम - किरण पावसकर, द्वितीय - अमित काळे, तृतीय - अजय महाजन, उत्तेजनार्थ - अमित काळे.

पॅटर्न - प्रथम - किरण पावसकर, द्वितीय - आनंद पंडित, तृतीय - संजीव हजारे, उत्तेजनार्थ - लक्ष्मण गोसावी.

पोर्टट्रेट (व्यक्तीचित्र) - प्रथम - चंद्रशेखर शिर्के, द्वितीय - पराग शिंदे, तृतीय - प्रविण देशपांडे, उत्तेजनार्थ - मनोज मुसळे.

सिव्हीक अवेअरनेस (जनजागृती) - प्रथम - विवेक येरळकर, द्वितीय - सुभाष जोशी, तृतीय - मनोहर हुमणे, उत्तेजनार्थ - प्रविण देशपांडे.

हौशी गट - फेस्टीव्हल (सण-उत्सव) - प्रथम - संदिप विचारे, द्वितीय - विजय पाटील, तृतीय - अजय विचारे, उत्तेजनार्थ - अपूर्वा काळे.

टेंपल (प्रार्थनास्थळे) - प्रथम - अजय विचारे, द्वितीय - संजय शिंदे, तृतीय - अपूर्वा काळे, उत्तेजनार्थ - स्वप्नाली मटकर.



*उथळसर प्रभाग समितीच्या प्रभाग अधिकारी सौ. छाया शुभेच्छा देतांना प्रभाग समिती सदस्य जगदीश थोरात, भा. तावडे, लक्ष्मण जाधव, दिलीप सोनावणे, श्री. घाग, श्री. कोरी*